सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

**दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in**

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/२०२४/ 438 दिनांक- 1 FEB 2024

## परिपत्रक –

**विषय- टिपण्णीलेखन व पत्रलेखनाबाबत...-**

संदर्भ- सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं.GAD-32036/12/2023-GAD (DESK 18) दिनांक २९/१२/२०२३.

सर्व संस्था प्रमुख/कार्यालयाप्रमुख यांना वरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व त्याखाली त्यांचे पदनाम लिहिण्याच्या सूचनेचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : GAD-३२०३६/१२/२०२३-GAD(DESK-१८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ डिसेंबर, २०२३

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-१००५/५६६/प्र.क्र.३०/२००५ १८(र.व का.), दि.१६ जून, २००५
२) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२९/१८(र.व का.), दि.१० फेब्रुवारी, २०१६
३) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.८१/२००५ १८(र.व का.), दि.३० मे, २०१८
४) शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.१२९/१८(र.व का.), दि.१७ ऑक्टोबर, २०१५

<u>शासन परिपत्रक</u>

मंत्रालयीन विभागातून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याची जी पद्धत आहे, त्याप्रमाणे राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधून पत्र निर्गमित करतेवेळी प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याच्या सूचना संदर्भाधीन क्र.१ ते ३ येथील परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, काही अधिकारी त्यांच्या स्वाक्षरीखाली त्यांचे नाव व पदनाम लिहित नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

२. तसेच, संदर्भाधीन क्र.४ येथील परिपत्रकान्वये टिप्पणीवरील चिन्हांकने कशाप्रकारे करावीत याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचना देऊनही अद्यापही काही अधिकारी/कर्मचारी टिप्पणीलेखन करताना योग्यप्रकारे चिन्हांकन करत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. सबब सर्व मंत्रालयीन विभागांना पुन्हा सूचित करण्यात येते की, कार्यालयामधून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याच्या सूचनेचे तंतोतंत पालन करावे, तसेच आपल्या अधिनस्त कार्यालयांनाही तसे सूचित करावे आणि टिप्पणीलेखन करताना संदर्भाकित क्र.४ येथील परिपत्रकामध्ये स्पष्ट केल्यानुसार चिन्हांकन करण्याची दक्षता घ्यावी. जेणेकरून भविष्यात अशा पत्रांबाबत किंवा टिप्पणी लेखनाबाबत काही समस्या उद्भवल्यास पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या/टिप्पणी मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याचा शोध घेणे अधिक सोपे होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
02 JAN 2024
आवक क्र. 12373 15

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३१२२९१२१७२२४४०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6BB466A80B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.12.29 12:16:25 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
१०. निवडनस्ती.

---

जा. क्र.: तंशिविकापु/आस्था-३(ब)/टिलेपले/२०२४/
दिनांक :

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
४१२ ब, तंत्र शिक्षण मंडळाची नवीन इमारत,
तिसरा मजला, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

प्रत : या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था / कार्यालय प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

त्यांना कळविण्यात येते की, संस्थेतून / कार्यालयातून निर्गमित होणा-या प्रत्येक पत्रावर स्वाक्षरीखाली कंसामध्ये स्वाक्षरी करणा-या अधिका-याचे नांव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याच्या सूचनेचे तंतोतंत पालन करावे,, तसेच टिप्पणीलेखन करताना दिनांक १७/१०/२०१५ येथील परिपत्रकामध्ये स्पष्ट केल्यानुसार चिन्हांकन करण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन भविष्यात अशा पत्रांबाबत किंवा टिप्पणी लेखनाबाबत काही समस्या उद्भवल्यास पत्रावर स्वाक्षरी करणा-या / टिप्पणी मंजूर करणा-या अधिका-याचा शोध घेणे अधिक सोपे होईल.

(डॉ. द. व्यं. जाधव),
सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदर परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.